भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये **Rs. 100**

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2017 ◑ RX 822156

| | |
|---|---|
| दस्ताचा प्रकार / अनुच्छेद क्रमांक (Nature of Document/Article No.) | शैक्षणिक कामी |
| दस्त नोंदणी करणार आहेत का? (Whether it is to be Registered) | |
| नोंदणी होणार असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव (If registerable Name of SRO) | |
| मिळकतीचे वर्णन (Property Description in Brief) | |
| मोबदला रक्कम (Consideration of Account) | |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव (Stamp Purchaser's Name) | श्रीमती सुवर्णा नरसू कांबळे मंगळवारपेठ, सातारा |
| दुसऱ्या पक्षकाराचे नाव (Name of Other Party) | |
| हस्ते असल्यास त्यांचे नांव व पत्ता (If Through other persons then Name & Address) | नितीन कुंभार |
| मुद्रांक शुल्क रक्कम (Stamp Duty Amount) | १००/- |

TREASURY OFFICE SATARA
1 SEP 2017
STAMP HEAD CLERK

GOVERNMENT OF MAHARASHTRA
S.N. GODASE
NOTARY
REG.NO.-1011
SATARA CITY

| | |
|---|---|
| मुद्रांक विक्री नोंद वही अनु. क्रमांक / दिनांक (Serial No./Date) | १२५१८ ०१।०९।१७ |
| मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही (Stamp Purchaser's Sign/Date) | [signature] |
| मोबदला रक्कम (Consideration of Account) | |
| परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याची सही व परवाना क्रमांक तसेच मुद्रांक विक्रीची ठिकाण / पत्ता | नितीन प्रल्हाद यादव<br>परवाना क्र. २३०१०११<br>मु. ठि.-गोविंद प्लाझा गाळा नं. २ सातारा<br>पत्ता-मेघदूत कॉलनी देगांव रोड नविन एम.आय.डी.सी. सातारा. |

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्या पासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

Scanned by CamScanner

# "करार नामा"

१) प्राचार्य,

सातारा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
कला व वाणिज्य महाविद्यालय,
११७, शुक्रवार पेठ, सातारा.

**आणि**

२) अध्यक्ष,

सातारा जिला हिंदी अध्यापक मंडल, सातारा,
राष्ट्रभाषा भवन
संभाजी नगर, सातारा, जि.सातारा - 415004

वरील दोन संस्थामध्ये हिंदी भाषेचा प्रचार प्रसार करण्यासाठी लागणारी सर्वतोपरी मदत, मार्गदर्शन, अभ्यासक्रम, प्रशिक्षण, परिषद, चर्चासत्र, विविध स्पर्धा तसेच सल्ला, सेवा व एकमेकांना पुरक ठरेल अशा पध्दतीने संस्थांची एकमेकांना मदत करणेसाठी सदर करार करणेत आला.

हा करार दिनांक 01/09/2017 ते 30/09/2020 या कालावधी साठी करणेत येत असून, त्यातील मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

1. सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडल,सातारा ही संस्था कायदेशीर नोंदणीकृत संस्था असून, तसेच राष्ट्रभाषा संबधी विविध परिक्षा आयोजित करणे, विविध स्पर्धा आयोजित करते, अध्यापकानसाठी विविध चर्चासत्र, परिषदांचे आयोजन असे कार्य करते.
2. सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडल,सातारा. 'हिंदी' राष्ट्रभाषाचे विकास व्हावा, विद्यार्थ्यांना हिंदी भाषा कौशल्य आत्मसात व्हावे यासाठी वेळोवेळी स्पर्धा, परिक्षांचे आयोजन करित असते.
3. सातारा मराठा विद्याप्रसारक समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा मध्ये कला व वाणिज्य क्षेत्रातील विद्यार्थ्यांना पदवी अभ्यासक्रम देत असते.
4. सातारा मराठा विद्या प्रसारक समाजाचे कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा हिंदी विभाच्या वतीने आयोजित केल्या जाणाऱ्या हिंदी भाषा प्रचार–प्रसार साठी व हिंदी साहित्य मंडळाच्यावतीने आयोजित कार्यक्रमांना व चर्चासत्र, परिषदांना सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडळ मदत करील.

Scanned by CamScanner

5. हिंदी राष्ट्रभाषचा प्रचार–प्रसार व्हावा व हिंदी राष्ट्रभाषेतून उपलब्ध रोजगार याची माहिती विद्यार्थ्यांना करून देण्यासाठी दोन्ही संस्था प्रयत्नशील राहतील.

6. सातारा जिला हिंदी अध्यापक मंडल सातारा व महाविद्यालयातील हिंदी विभाग दोन्ही संस्थेकडून घेतल्या जाणाऱ्या कार्यक्रमांना सर्वतोपरी मदत करतील.

7. सदर संस्थानमध्ये घेतले जाणारे कार्यक्रम घेत असताना उपलब्ध इमारत व सामानाची काळजी दोन्ही संस्थाचे प्रतिनिधी योग्य पध्दतीने घेतील यात महाविद्यालयाचे व सातारा जिला हिंदी अध्यापक मंडळाचे नुकसान झाल्यास नुकसान भरून देण्यास दोघे ही कटीबध्द असतील.

8. कार्यक्रमांच्या खर्चाचे नियोजन दोन्ही बाजुचे पदाधिकारी कार्यक्रमाच्या पूर्वी करतील व त्यानुसार खर्च करण्यात येईल.

9. हा करार मुदतीआधी रद्द करावयाचा झाल्यास दोन्ही संस्था एकमेंकांना 30 दिवस अगोदर लेखी सूचनेद्वारे माहिती देतील व करार संपुष्ठात आणतील.

प्राचार्य,
सातारा मराठा विद्या प्रसारक समाजाचे
कला व वाणिज्य महाविद्यालय,
११७, शुक्रवार पेठ, सातारा.

अध्यक्ष
सातारा जिल्हा हिंदी अध्यापक मंडल, सातारा,
राष्ट्रभाषा भवन
संभाजी नगर, सातारा, जि.सातारा - 415004

अध्यक्ष
सातारा जिला हिंदी अध्यापक मंडल,
राष्ट्रभाषा भवन, संभाजीनगर, सातारा.

मुख्य कार्यकारी अधिकारी

BEFORE ME
S. N. GODASE
NOTARY MAHARASHTRA STATE
NOTED & REGISTERED
AT SERIAL NO. 507
6/10/2017

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

CANCELLED




Scanned by CamScanner

# कला व वाणिज्य महाविद्यालय, सातारा.

## हिंदी विभाग

## हिंदी दिन समारोह

★ दिन - गुरूवार तिथि - 14/09/2017 समय - सुबह 9.30 बजे

### कार्यक्रमपत्रिका

❖ प्रतिमापूजन : प्रमुख अतिथियोंके करकमलों से.

❖ प्रास्ताविक : प्रा. सुवर्णा कांबळे.

❖ स्वागत : प्रमुख अतिथियों का स्वागत
प्राचार्य डॉ. यशवंत पाटणेजी के करकमलों से

❖ गौरव : प्रमुख अतिथियोंके करकमलों से प्रतियोगिताओं में पारितोषिक प्राप्त छात्रों का गौरव.

❖ प्रमुख अतिथि : मा. ता. का. सुर्यवंशी
( अध्यक्ष, सतारा हिंदी अध्यापक मंडल, सतारा )

❖ अध्यक्ष : मा. प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे.
(कला व वाणिज्य महाविद्यालय,सातारा.)

❖ आभार : प्रा. सुनिता गायकवाड.


❖ सूत्रसंचालन : प्रा. रेणुका नाईक

Scanned by CamScanner

# ऐक्य

९३ वर्षांची वाचनीय परंपरा

www.dainikaikva.com  सातारा सोमवार दि. १८/९/२०१७  email : news@dainikaikya.org

बोलताना ता. का सूर्यवंशी व्यासपीठावर डॉ. यशवंत पाटणे, प्रा. सुवर्णा कांबळे, प्रा. सुनीता गायकवाड.

# देशाच्या स्वातंत्र्याची, निर्मितीची भाषा हिंदी

▲ **सातारा**, दि. १७ : हिंदी भाषा आजच्या जागतिकीकरणात भारतवासीयांना रोजगार उपलब्ध करुन देवू शकते म्हणून देशाच्या स्वातंत्र्याची, नवनिर्मितीची भाषा हिंदी असून तिचा प्रचार व प्रसार करणे आवश्यक आहे, असे मत ता. का. सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

कला वाणिज्य महाविद्यालय, सातारा हिंदी विभागाच्यावतीने आयोजित हिंदी दिन कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

सूर्यवंशी म्हणाले, भारत देशाची राजभाषा म्हणून आज हिंदी भाषा कार्यरत आहे. भारतीय संविधानाने हिंदी भाषेला राष्ट्रभाषेचा सन्मान दिला आहे. परंतु इंग्रजी भाषेच्या प्रभावाने आपल्या राष्ट्रभाषाचे विकास रोखला गेला आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस, महात्मा गांधी, पुरुषोत्तमदास टंडन यांनी भारत देशाला स्वतंत्रता प्राप्त करण्यासाठी हिंदी भाषेचा उपयोग करुन स्वतंत्रता प्राप्त करुन दिली.

हिंदी भाषा रोजगार निर्मितीचे सशक्त माध्यम बनले असून नवयुवकांनी हिंदी भाषा आत्मसात करणे आवश्यक आहे, असे मत अध्यक्षस्थानावरुन बोलताना प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुवर्णा कांबळे यांनी केले. प्रा. सुनीता गायकवाड यांनी आभार मानले. प्रा. रेणुका शहाणे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास प्रा. पी. व्ही. सातपुते, प्रा. डॉ. आर. बी. सातपुते, प्रा. डॉ. राजेंद्रकुमार चेतीवाल, प्रा. डॉ. लोखंडे, प्रा. स्वाती बोटे, प्रा. गुणकली कुलकर्णी व विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned by CamScanner